# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### नवी मुंबई (ठाणे) येथील माता बाल रुग्णालयात येणा-या गरीब महिला रुग्णांना कोणत्याही प्रकारच्या आरोग्य सेवा मिळत नसल्याबाबत

**(१) २६ (२३-१२-२०१४). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई (ठाणे) येथे लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या माताबाल रुग्णालयात येणा-या गरीब महिला रुग्णांना कोणत्याही प्रकारच्या आरोग्य सेवा मिळत नसल्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष पसरला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालयात येणा-या गरीब महिला रुग्णांना आरोग्य सेवा देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) सद्यस्थितीत ऐरोली व नेरुळ येथील माता बाल रुग्णालयात माता व बालकांसाठी बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवा सुरु करण्यात आल्या आहेत. तर माता बाल रुग्णालय, बेलापूर येथे बाह्यरुग्ण सेवा सुरु करण्यात आली आहे.

या रुग्णालयांकरीता रुग्णालयीन उपकरणे व फर्निचर खरेदीसाठी महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून ती अंतिम टप्पयात आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरीता आवश्यक असलेल्या वैद्यकीय निमवैद्यकीय व तत्सम संवर्गातील कर्मचारीवृंदाची अतिरिक्त पदे निर्माण करण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेकडून शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## धारावी (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या उर्दु शाळेतील २७१ विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आल्याबाबत

**(२) ११० (२३-१२-२०१४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी (मुंबई) येथील महानगरपालिका उर्दु शाळेच्या २७१ विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आल्याचे माहे जून, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळेत ७ वी उत्तीर्ण झालेल्या ३५० विद्यार्थ्यांपैकी केवळ ७८ विद्यार्थ्यांनाच आठवीमध्ये प्रवेश देण्यात आला असून उर्वरित मुलांना प्रवेश नाकारण्यात आल्याने सदरहू विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान पाहता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही. सन २०१३-१४ मध्ये धारावी मुंबई येथील महानगरपालिका उर्दु शाळेच्या इयत्ता ७ वी चे एकूण ४१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. महानगरपालिकेच्या वर्गतुकडीला मान्यता असल्यामुळे तेथे ७८ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. ६८ विद्यार्थ्यांनी न्यू सायन महापालिका उर्दू शाळेत प्रवेश घेतला आहे व उर्वरित २७२ विद्यार्थ्यांनी जवळपासच्या खाजगी शाळेत प्रवेश घेतला आहे. सर्वच विद्यार्थ्यांनी ८ वी मध्ये प्रवेश घेतला असून कोणीही विद्यार्थी ८ वीच्या प्रवेशापासून वंचित नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथे कचऱ्यांचे साचलेल्या ढीगामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(३) ८७६ (२७-०१-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथे कचऱ्यांचे साचलेले ढीग, अनियमित फवारणी, त्याचबरोबर तुंबलेली गटारे यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात पायाभूत सुविधांचा पूर्णता अभाव दिसून येत असल्याने आरोग्याच्या दृष्टीने पूर्णत: दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे पाहता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) कामोठे परिसरातील कचरा रोजच्या रोज उचलला जातो व तेथे स्वच्छता ठेवली जाते. कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरु नये ह्यासाठी सिडको जंतुनाशक पावडर वेळोवेळी टाकून घेते. तसेच, कामोठे येथे सिडकोने R.C.C. गटारे बांधली असून, पावसाळ्यापूर्वी वा पावसाळ्यात गटारे साफ केली जातात व नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार नाही याची काळजी घेतली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील कळंबोली लोखंड आणि स्टील मार्केट यार्ड (बाजारपेठ) येथे कोणत्याही प्रकारच्या मुलभूत सुविधा नसल्याबाबत**

**(४) १४९१ (२२-१२-२०१४). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील कळंबोली लोखंड आणि स्टील मार्केट यार्ड (बाजारपेठ) गत २५ वर्षापासून अस्तित्वात असूनही आजपावेतो येथे कोणत्याही प्रकारच्या मुलभूत सुविधा नसल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त बाजारपेठेची अवस्था सुधारण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :**(१), (२) मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीचे कामकाम दि. १.११.८७ पासून सुरु झाले असून सदर समितीमध्ये लोखंड व पोलाद घाऊक व्यापार यांना एकूण १९०१ इतके गाळे भाडेपट्याने सिडकोने दिलेले आहेत व त्याप्रमाणे व्यापाऱ्यांचे कामकाज सुरु आहे.

मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती व सिडको यांच्यामध्ये दि. २३.६.२०११ रोजी झालेल्या करारानुसार अंतर्गत रस्ते, पावसाळी गटारे, पदपथे, दिवाबत्ती, पाणी पुरवठा इ.सुविधा बाजार समितीला हस्तांतरीत केलेल्या असून त्या सुविधांची दुरुस्ती देखभाल व दर्जा उंचावण्याची कामे मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीकडून करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबईतील एक लाख कोटींच्या पायाभूत कामांचे प्रस्ताव दिल्याबाबत**

**(५) १८८० (२३-१२-२०१४). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबईतील एक लाख कोटींच्या पायाभूत कामांचे प्रस्ताव राज्य शासनाला माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांद्रे-कुर्ला संकुलातील शिल्लक भूखंडाची रहिवासी आणि व्यावसायिक वापरासाठी विक्री करुन या प्रकल्पांसाठी भांडवल उभारण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व या संदर्भातील शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) या संदर्भात अद्यापही कोणताच निर्णय नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबत सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मेट्रो लाईन-२ मेट्रो लाईन-४ , मुंबई पारबंदर प्रकल्प, विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्ग, वांद्रे कुर्ला चुनाभट्टी मार्ग, विस्तारीत मुंबई नागरी पायभूत सुविधा अंतर्गत कामे, वांद्रे संकुलाकडे येणारे जाणारे उड्डाणपुल व मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा -३ अशा प्राधिकरणाचे अर्थसहाय्य अपेक्षित असलेल्या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी विविध आंतरराष्ट्रीय संस्था, जागतिक बँक आणि अन्य स्त्रोताद्वारे भांडवल उभारण्याचे नियोजित असून प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता आवश्यकता भासल्यास वांद्रे कुर्ला संकुलात उपलब्ध असलेल्या भूखंडाची विक्री करुन निधी उभारण्याचे प्राधिकरणाचे नियोजन आहे.

---

**मेट्रो-२ च्या कारडेपोसाठी पर्यायी जागेची व्यवस्था**

**(६) २२८७ (२७-०१-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द व चारकोप येथील नियोजित जागा “सीआरझेड” क्षेत्रात येत असल्याने केंद्रीय पर्यावरण खात्याने मेट्रो-२ च्या कारडेपोसाठी देण्यास नकार दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेट्रो-२ च्या कारडेपोसाठी पर्यायी जागेची व्यवस्था केली आहे काय, असल्यास, सदर कारडेपो कोणत्या ठिकाणी बांधण्यात येणार आहे,

(३) यासंदर्भात पर्यायी व्यवस्था केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१६) :**(१),(२) व (३) मेट्रो-२ च्या कारडेपोची नियोजित जागा बहुतांशी प्रमाणात “सीआरझेड” क्षेत्रात येत असल्यामुळे केंद्रीय पर्यावरण विभागाने अटींच्या अधीन राहून परवानगी दिली असून त्यातील काही जटील अटींमुळे त्या ठिकाणी मेट्रो डेपो बांधणे शक्य नाही. पर्यावरण विभागाच्या जटील अटींमुळे मेट्रो-२ च्या कारडेपोच्या बांधणीकरिता मौजे मालवणी येथील न.भू.क्र.६ अ मधील १९.७९ हेक्टर ही पर्यायी जागा नियोजित केली आहे. मेट्रो-२ प्रकल्पाची कारडेपोसाठी पर्यायी जागेची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकारणाने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्याकडे मागणी केली आहे. परंतु त्यामधील भू.क्र.”ड” क्षेत्र ८००० चौ.मी. शासनाने न्यायालयाला मंजूर केले असून त्याचा ताबा देण्यात आला आहे. तसेच भूखंड क्र.ई क्षेत्र २३८४० चौ.मी.मांजरा एज्युकेशन ट्रस्टला प्रदान केला आहे. या दोन्ही संस्थांना पर्यायी जागेमध्ये स्थलांतरित करणेबाबतची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे.

---

**ऐरोली (नवी मुंबई) तसेच घणसोली परिसरात स्मशानभुमीची सोय उपलब्ध करुन देणेबाबत**

**(७) २४६६ (२३-१२-२०१४). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली (नवी मुंबई) परिसरात भिमनगर, कातकरीपाडा, पंचशिलनगर तसेच घणसोली, शंकरबुवावाडी, अर्जुनवाडी, तवतळवाली येथील नागरिकांना स्माशनभूमीची सोय नसल्याने रबाळे येथे स्माशानभूमीचा वापर करावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रबाळे येथील स्मशानभूमी अतिशय दूर असल्याने ऐरोली व घणसोली परिसरातील नागरिकांची अतिशय गैरसोय होते त्यामुळे ऐरोली व घणसोली परिसरात स्वतंत्र स्मशानभूमी बांधून देण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने सिडकोकडे भूखंडाची मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांची होणारी गैरसोय विचारात घेऊन उक्त दोन्ही ठिकाणी स्वतंत्र स्मशानभूमीसाठी सिडकोने अद्यापी भूखंड उपलब्ध करुन दिले नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, भूखंड तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०१-२०१६) :**(१) होय.

(२) ऐरोली व घणसोली परिसरात स्वतंत्र स्मशानभूमीकरीता नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत सिडको व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे जागेची मागणी करण्यात आलेली आहे.

(३) व (४) सिडकोने ऐरोली सेक्टर ९ व २० तसेच घणसोली परिसरात रबाळे गाव, तळवली गाव, घणसोली गाव व नोडल क्षेपत स्मशानभूमीकरीता जागा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

तथापि, घणसोली विभागातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रामधील आंबेडकरनगर, भिमनगर, कातकरीपाडा, पंचशिलनगर या वसाहतींकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत स्मशानभूमी/दफनभूमीकरीता अद्याप जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेडकनू महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या शैक्षणिक व सामाजिक संस्थांना सवलतीच्या दराने भूखंड मिळणेबाबत

**(८) २४७६ (२३-१२-२०१४). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या शैक्षणिक व सामाजिक संस्थांना सवलतीच्या दराने भूखंड देण्याबाबत सिडको महामंडळाने शासनास प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, व त्यानुसार प्रकल्पग्रस्तांच्या संस्थांना सवलतीच्या दराने भूखंडाचे वितरण करण्यात येत आहे काय,
(३) अद्यापी शासनाचा निर्णय झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :**(१) व (२) होय, नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या संस्थांना शाळा, महाविद्यालये, धार्मिक उपक्रम सांस्कृतिक संकुले, महिला मंडळ, व्यायाम शाळ, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे इत्यादी प्रयोजनासाठी सवलतीच्या दराने भुखंड वाटप करावयाच्या सुधारीत धोरणास संचालक मंडळाच्या ठराव क्र. १०६९९ व १०७१६ दि. १९.१०.२०१२ अन्वये मान्यता प्राप्त झाली होती. सिडकोच्या प्रस्तुत धोरणास शासनाने दि. ९.९.२०१४ रोजी मान्यता दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वसई तालुक्यशतील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या कामांबाबत

**(९) २७०९ (२३-१२-२०१४). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक ४ मार्च, २०१३ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक लोकप्रतिनिधींनी वसई तालुक्यातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या कामांबाबतचे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने त्यावर काय कार्यवाही केली आहे,
(३) अवर सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, यांनी दिनांक ८ मार्च, २०१३ रोजीच्या पत्रान्वये महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधि. यांचेकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यावर आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आली किंवा कसे,
(५) प्रलंबित कामांबाबत शासनाची भूमिका काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१६) :**(१) व (२) होय, वसई-विरार क्षेत्रातील बापाने हायवे ते जूचंद्र नायगांव रस्ता- रस्ता रुंदीकरण व नायगांव रेल्वे स्थानकाजवळ उड्डाणपुलाचे काम प्रगतीपथावर आहे. पूर्वकडील वैतरणा ते जूचंद्र रस्त्याच्या कामाचा सुसाध्यता अहवाल व पश्चिमेकडील विरार ते नायगांव रस्त्याच्या सुसाध्यता अहवाल वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे प्रलंबित असून अहवाल प्राप्त होताच सदर कामाचा प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी सादर करण्याचे नियोजित आहे. नायगांव भाईंदर खाडीवरील पूलासंदर्भात सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निविदा मागवून काम सूरू होणे अपेक्षित आहे. वसई-विरार शहर महानगरपालिकेची हद्दीतील रेल्वे लेवल क्रॉसींग क्र. ४१ (एल.सी.४१) ला मंजूरीबाबत कोणताही प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्रस्तावित नाही. विरार -अलिबाग मल्टी कॅरीडोअर संदर्भातील सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराच्या नेमणूकीची प्रक्रिया मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(३), (४) व (५) होय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सर्वकष परिवहन अभ्यासातील शिफारशीनुसार वसई तालुक्यातील दहिसर-मिरारोड-माणिकपूर-विरार (२९.९ कि.मी.) असा मेट्रो मार्ग प्रस्तावित केला आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी प्राधिकरण नियोजनबध्द पध्दतीने आणि निधी उपलब्धतेनुसार टप्प्याने-टप्प्याने पुढील कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे.

---

## दहिसर(पूर्व)मुंबई येथील धारखाडी भागातील शीतल हॉटेलच्या मागील बाजूच्या तबेल्यात होत असलेले अनधिकृत बांधकाम

**(१०) ३५५५ (२३-१२-२०१४). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर (पूर्व), मुंबई येथील धारखाडी भागातील शीतल हॉटेलच्या मागील बाजूला शुल्का कंपाऊंड येथील पालिकेच्या शाळेशेजारी असलेल्या एका मोठ्या तबेल्यात अनधिकृत बांधकामे होत असल्याने दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुंषगाने सदर अनधिकृत बांधकामाबाबत कोणती कारवाई केली वा येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :**(१) दहिसर (पूर्व) धारखाडी भागातीलश्री.मोहन देवा भरवाड यांच्या अस्तित्वात असलेल्या तबेल्यात बांधंकाम होत असल्याचे दिनांक २५.११.२०१४ रोजी निदर्शनास आले.
(२) बृहन्मुंबई महानरगपालिकेतर्फे दिनांक २५.११.२०१४ रोज सदर तबेल्यातील अनधिकृत भिंतीच्या बांधकामाचे निष्कासन आयोजित केले होते. त्यांच दिवशी दुपारी दिंडोशी येथील दिवाणी न्यायालयात तबेल्याच्या मालकाने दावा दाखल केला, तथापि, मा.न्यायालयाने त्याच दिवशी सदर अनधिकृत बांधकामावर कायद्यानुसार कारवाई करावी असा निर्णय दिला, तबेल्याच्या मालकाकडे दुरुस्ती/बांधकामाबाबतची कोणतीही परवानगी नसल्याने त्याला दिनांक २६.११.२०१४ रोजी महापालिका अधिनियम, ३५४ ए अन्वये नोटीस बजाविण्यात आली. परंतु दिनांक २७.११.२०१४ रोजी तबेला मालकांच्या वकीलाने दिंडोशी येथील दिवाणी न्यायालयात पुन्ह दावा दाखल केला . पक्षकाराने सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केल्यानंतर दिनांक ६.१२.२०१४ रोजी पक्षकारास अंतिम आदेश पारित करण्यात आले. त्यानुसार दिनांक ०८.१२.२०१४ रोजी महापालिकेतर्फे निष्कासन करण्यात येणार होते. परंतु दिनांक ०८.१२.२०१४ रोजी नगर दिवाणी न्यायालयात पक्षकाराने पुन्हा दावा दाखल केला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक ०७.१२.२०१५ रोजी ठेवण्यात आली आहे.

---

## पुणे शहरातील रामवाडी ते वनास व निगडी ते कात्रज या मार्गावरील मेट्रो रेल्वे प्रकल्पाबाबत

**(११) ४२१५ (२१-०१-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील रामवाडी ते वनाझ व निगडी ते कात्रज या मार्गावरील मेट्रो रेल्वे प्रकल्प शासनाने मंजूर केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मेट्रो प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास किती निश्चित कालावधी लागणार आहे व नियोजित प्रकल्पासाठी खर्चाची एकूण रक्कम किती आहे,
(३) असल्यास, सद्यस्थितीत सदर प्रकल्प पुर्ण करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही सुरु आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१६) :**(१), (२) व (३) होय. सदर प्रकल्पास आर्थिक सहभागासह अंतिम केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्पाची पुढील कार्यवाही होणार आहे.

प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम चालू झाल्यानंतर सुमारे ५ ते ६ वर्षाचा कालावधी लागणार आहे. सदर प्रकल्पास नोव्हेंबर, २०१५ च्या दराने रु. ११५२२ कोटी खर्च अपेक्षित आहे. या खर्चामध्ये पिंपरी ते निगडी आणि स्वारगेट ते कात्रज या वाढीव मेट्रो मार्गिकेच्या खर्चाचा अंतर्भाव नाही.

पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दोन्ही मार्गिकांचे काम एकाच वेळी सुरु करण्याचे नियोजीत असून सदर प्रकल्पास मान्यता देण्यासाठी सुधारित प्रकल्प अहवाल दि. ०७.१२.२०१५ च्या पत्रान्वये केंद्रशासनास पाठविण्यात आला आहे.

---

**अमरावती शहराचा मोठया प्रमाणात विस्तार झाला असून विस्तारीत झालेल्या काही भागात पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकण्यात आलेली नसल्याबाबत**

**(१२) ४५४४ (२३-१२-२०१४). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहराचा मोठया प्रमाणात विस्तार झाला असून विस्तारीत झालेल्या काही भागात पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकण्यात आलेली नसल्याने या भागात १३० कि.मी. पाईप लाईन टाकणे तसेच जुन्या भागातील पाईप लाईनला ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्योन १९२ कि.मी. ची पाईप लाईन बसविणे व शहराची लोकसंख्या वाढत असल्यामुळे २ उंच टाक्या व २ बैठया टाक्यांची निर्मिती करण्याचा प्रस्ताव अमरावती महानगरपालिकेने सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे काय,

(३) या प्रकल्पाची कामे प्रत्यक्ष केंव्हा सुरु होणार आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्यान महाअभियानाअंतर्गत अमरावती शहरातील पाणी पुरवठा प्रकल्पाचा प्रस्तावामध्ये असलेल्या त्रुटींबाबत संचालनालयामार्फत आयुक्त, अमरावती महागनरपालिका यांना दि. १५.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. परंतु अद्याप त्रुटींची पुर्तता अमरावती महानगरपालिकेमार्फत करण्यात आली नाही.

---

**मुंबई महानगर प्रदेशासाठी दोन उड्डाणपूल, वाहनांसाठी एक भुयारी मार्ग आणि दोन प्रकल्पांसाठी सविस्तर अहवाल प्रकल्प तयार करण्यासाठी**

**(१३) ६५५६ (०७-०४-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेशासाठी दोन उड्डाणपूल, वाहनांसाठी एक भुयारी मार्ग आणि दोन प्रकल्पांसाठी सविस्तर अहवाल प्रकल्प तयार करण्यासाठी व शिळफाटा - महापे रस्त्यावर एम ॲण्ड जंक्शन येथे चार मार्गिकांचा उड्डाणपूल राज्याचे मुख्य सचिव आणि महानगर प्रदेश

विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उड्डाणपूल, भुयारी मार्ग व दोन प्रकल्प मुंबई शहराच्या कोणत्या भागात कार्यान्वित करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, मंजुरीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे व किती कालावधीत सदर प्रकल्प पुर्ण होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१६) :**(१) होय, ठाणे-भिवंडी-कल्याण या मार्गाकरिता सार्वजनिक जलद वाहतुकीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या प्रस्तावास मुंबई महागनर प्रदेष विकास प्राधिकरण्यामार्फत मंजूरी मिळालीआहे. ठाणे- भिवंडी-कल्याण दोन उड्डाणपूल व एक भुयारी मार्ग प्रर्वद्रुतगती मार्गावर छेडानगर, घाटकोपर येथे शिळफाटा व मुंब्रा येथे २ उड्डाणपूल तसेच ठाणे-भिवंडी-कल्याण येथील सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्थेकरिता नवघर ते चिरनेर यासाठी बहुउद्देशिय सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तयार करण्यात येत आहे.
(२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठाणे बेलापूर रस्त्यावरील उड्डाणपुल व महापे येथील भुयारी मार्ग या प्रकल्पांना प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूरी दिली असून ठाणे बेलापूर रस्त्यावरील उड्डाणपूल व महपे येथील भूयारी मार्गाचे प्रत्यक्ष कामास दिनांक १०३.२०१५ रोजी सुरू करण्यात येवून सदर काम २४ महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित आहे. तसेच मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील छेडानगर जंक्शन, घाटकोपर पूर्व येथे वाहतूक सुधारणा प्रकल्प राबविण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून छेडानगर जंक्शन, घाटकोपर (पूर्व) येथील वाहतूक सुधार प्रकलपाचे अंदाज पत्रक व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. ठाणे-भिवंडी-कल्याण परिसरातील व सभोवतालच्या क्षेत्रात होणरा विकास, लोकसंख्या वाढ तसेच रोजगार वाढ लक्षात घेवून मुंबई महानगर प्रदरेश विकास प्राधिकरणाने या मार्गावर योग्य ती सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्थेची पून्हा तपासणी करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता सल्लागाराची निवड करण्यात आली असून पुढील काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सस्तावर प्रगतीपथावर आहे.

---

**कल्याण (पूर्व), जि.ठाणे या भागात आरक्षित भुखंडावर अनधिकृत बांधकामे**

**(१४) ६६६७ (०७-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (पूर्व), जि.ठाणे या भागात आरक्षित भुखंडावर अनधिकृत बांधकामे झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांची गैरसोय दुर करण्याकरिता शिधावाटप केंद्र मंजुर असूनही भुखंड न मिळणे, आरक्षित भुखंड भुमाफियांच्या ताब्यात असणे यावर कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे,
(३) असल्यास, हे भुखंड ताब्यात घेवुन शासकीय कार्यालयाकरिता किंवा नागरिकांच्या हितार्थ योजनेकरीता आरक्षित करण्यात येणार आहेत काय,
(४) असल्यास, या आरक्षित भुखंड ज्या भुमाफियांच्या ताब्यात आहे त्यांच्यावर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण (पूर्व) येथे नवीन शिधावाटप कार्यालयाकरीता मोकळी/बांधीव जागा मिळण्याबाबत शिवावाटप अधिकारी यांनी महानगरपालिकेकड मागणी केलेली आहे. परंतु कल्याण (पूर्व) भागात "शिधावाटप केंद्र" याकरीता विकास योजनेमध्ये आरक्षित प्रस्तावित नाही.

तथापि, मौजे चिकणघर, कल्याण (पश्चिम) येथे कल्याण डोबिंवली महानरगपालिकेचया मंजूर विकास योजनेमध्ये आरक्षण क्र. १९४ “राज्य शासकीय कार्यालये” यासाठी आरक्षित आहे. या आरक्षणाखालील १०६६६.०० चौ.मी.एवढे क्षेत्र महानगरपालिकेने संपादित केलेले आहे.
(४) कल्याण - डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षित भुखंडावर अतिक्रमण आढळल्यास बांधकामधारकाविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदीनुसार महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई, चेंबूर सुमननगर येथे बांधण्यात आलेल्या उडड्ण पुलामुळे वाहतुकीत झालेली वाढ

**(१५) ६८१२ (१०-०४-२०१५). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, चेंबूर सुमननगर येथे बांधण्यात आलेल्या उडड्ण पुलामुळे सायन वरुन येणा-या नवी मुंबई, पुणे येथे जाणा-या वाहतुकीत प्रचंड वाढ झालेली आहे, लाल डोंगर येथील वसाहतीमध्ये राहणा-या हजारो व्यक्तींना तसेच शाळकरी मुलांना बस थांब्याकडे जाण्यासाठी व्ही.एन.मार्ग ओलांडून जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उड्डाण पुलावरुन वेगाने येणा-या वाहतुकीमुळे अपघाताचे प्रमाण प्रचंड वाढल्याने व्ही.एन.पुरव मार्ग पार करण्यासाठी भूयारी मार्ग बांधण्याची मागणी गत दोन वर्षापासून होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मार्गावर भुयारी मार्ग बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. परंतु सदर ठिकाणी पादचारी पूल बांधण्याची मागणी करण्यात आली आहे.
(३) सदर ठिकाणी भुयारी मार्गाऐवजी पादचारी पूल बांधण्याचे काम बृहन्मुबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले असून, सदर काम एक वर्षात होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या मुला-मूलींना उद्योग व व्यवसायासाठी आणि त्याकरीता लागणाऱ्या आवश्यक वाहनांसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१६) ६८५८ (०८-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या मुला-मुलींना उद्योग व व्यवसाय करता यावेत यासाठी तसेच उद्योग व्यवसायासाठी लागणा-या आवश्यक वाहनांसाठी शासनाने अर्थसहाय्य उपलब्ध करुन द्यावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनांच्या अनुषंगाने अर्थसाहय उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०१६) :**(१) होय.
(२) नवी मुंबई प्रकल्पाग्रस्तांच्या मुला-मुलींना उद्योग व व्यवसाय करता यावेत यासाठी वाहनांसाठी अर्थसहाय्य सिडकोकडून उपलब्ध केले जात नाही, तथापि, प्रकल्पग्रस्त मुला-मुलींना त्यांच्या व आवडीनुसार व पात्रतेनुसार विनामूल्य प्रशिक्षण दिले जाते आणि शासकीय संस्था व बँका यांच्या माध्यमातून अर्थसहाय्य मिळण्यासाठी सिडकोकडून मार्गदर्शन केले जाते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई विभागातील सिडकोनिर्मित लिज होल्ड इमारतींच्या जमिनी फ्री होल्ड करून मिळण्याबाबत**

**(१७) ६८६९ (०६-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विभागात सिडकोने मोठया प्रमाणावर राबविलेल्या गृह प्रकल्पातील सदनिका प्रचलित दर आकारून विकल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोने सदरच्या सदनिका विकल्या असल्या तरी इमारती खालील जमिनीलिज होल्डवर दिल्या असल्यामुळे जमिनीची मालकी सिडकोकडेच राहते, त्यामुळे सदनिका ट्रान्सफर करतांना वा इतर व्यवहार करतांना सिडकोची एन.ओ.सी.घ्यावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद विभागात सिडकोने लिज होल्ड जमिनी फ्री होल्ड केल्या असल्यामुळे त्याच धर्तीवर नवी मुंबई विभागातील जमिनी फ्री होल्ड करून मिळाव्यात म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना जानेवारी, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने जमिनी फ्री होल्ड करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०१६) :**(१), (२) व (३) होय.

(४) औरगाबाद येथील वाटप केलेल्या कुठल्याही भुखंड अथवा इमारतीचे लिज होल्ड पध्दतीवरुन फ्री होल्ड पध्दतीमध्ये रुपांतरण करण्यात आलेले नाही. नवी मुंबई विभागातील वाटप केलेल्या लिज होल्ड जमिनी व इमारती फ्री होल्ड करण्याबाबत सिडको महामंडळ पुर्वतपासणी करीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील कुळगांव बदलापूर नगरपालिका हद्दीत सफाई कामगारांना बोगस दाखवून ठेकेदारांमार्फत खोटी देयके सादर केल्याबाबत**

**(१८) ७२५७ (०७-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कुळगांव बदलापूर नगरपालिका हद्दीतील सफाई कामगारांना बोगस दाखवून ठेकेदारांमार्फत खोटी देयके काढून शासनाची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले व तदनुसार बोगस सफाई कामगार दाखवून खोटी काढणाऱ्या ठेकेदार व नगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने कंत्राटी सफाई कामगारांची नेमणूक केलेली नाही.

(२), (३) व (४) नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २०० चे अंमलबजावणी करीत एकत्र उत्पन्न आधार (Out put basis) वर कामे करण्याकरीता ठेकेदारांची ऑगस्ट, २०१३ पासून तीन वर्षासाठी नेमणुक करण्यात आलीआहे.

सदर ठेकेदारांकडील कामगारांचे वेतन व भत्ते देण्याची जबाबदारी नगरपरिषदेबरोरज केलेल्या करारपत्रानुसार ठेकेदारांची निश्चित केलेली आहे.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) शहर विकास आराखड्यात दर्शविल्याप्रमाणे ६० फूट जागा उपलब्ध असूनही नाथ हायस्कूल चौक ते इंडिया बँक या रस्ताबाबत**

**(१९) ७८३० (०७-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) शहर विकास आराखड्यात दर्शविल्याप्रमाणे ६० फूट जागा उपलब्ध असूनही नाथ हायस्कूल चौक ते इंडिया बँक हा रस्ता केवळ २३ फूट रुंदीचा तयार केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकास आराखडा धाब्यावर बसवून सदर रस्ता २३ फुट करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०१६) :** (१) होय.
(२) निधीची उपलब्धता तसेच सद्यस्थितीत त्या रस्त्यावरील वाहतूक लक्षात घेऊन २३ फूट रुंदीचा रस्ता तयार करण्यात आला आहे.
(३), (४) व (५) क्षेत्रिय स्तरावरुन दिलेली कारणमीमांसा विचारात घेता चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे ते डोंबिवलीला थेट जोडणारा खाडीपुल उभारण्याबाबत**

**(२०) ८४४० (१०-०४-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे ते डोंबिवलीला थेट जोडणारा खाडीपुल उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५) :**(१) व (२) होय. प्रस्तावित कामाची निविदा प्रक्रिया मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे शहरातील घोडबंदर रोड ते मिरा-भाईंदर खाडीकिनारे पर्यटनाच्या दृष्टिने विकसित करण्याबाबत**

**(२१) ९३८७ (०६-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील घोडबंदर रोड ते मिरा-भाईंदर खाडीकिनारे पर्यटनाच्या दृष्टिने विकसित करण्यात यावे तसेच एमएमआरडीएच्या माध्यमातून खाडीकिनारे रस्त्याच्या माध्यमातून जोडण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे एका पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर काम करण्यासाठी पर्यटन संचानालय, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी कळविण्यात आले आहे. सदर भागाकडे जाणारे रस्ते विकास योजनेस दर्शविणे, सी.आर.झेडची मान्यता घेणे इत्यादि कामाची कार्यवाही मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

जेसल पार्क ते घोडबंदर खाडोरस्ता हाती घ्यावे किंवा कसे, याबाबतचा अभ्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे.

---

**मुंबईतील समुद्र किना-यावरुन किनारी मार्ग बनविण्याबाबत**

**(२२) १०७१९ (१०-०४-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील समुद्र किना-यावरुन किनारी मार्ग बनविण्यासाठी शासनाने एक तज्ञ समिती नेमलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सागरी किनारा रस्त्याच्या प्रकल्पासाठी शक्यता अहवाल तयार करणे, विस्तृत प्रकल्प अहवाल, पर्यावरणाचा अभ्यास करुन अहवाल करणे, पर्यावरण व वन मंत्रालयाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आणि निविदा व्यवस्थापनाचे काम करणे यासाठी मे. स्तुप आणि ई. व आय. या सल्लागाराची नियुक्ती मार्च २०१४ मध्ये केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या कालावधीत**
**झालेला कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार**

**(२३) ११४०८ (०८-०४-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त श्री.रामनाथ सोनवणे यांच्या कालावधीत झालेल्या कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याने सदर आयुक्तांची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी माहे जानेवारी, २०१५ च्या तिस-या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०१६) :**(१) दि २०/०१/२०१५ रोजी कल्याण येथे झालेल्या पत्रकार परिषदेत श्री.जितेंद्र आव्हाड, विधानसभा सदस्य यांनी याबाबत एस.आय.डी मार्फत चोकशी करण्याची मागणी केली होती. मात्र तशा आशयाचे लेखी निवेदन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस प्राप्त झाले नसल्याचे आयुक्त , कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

राज्य शासनास देखील अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली (जि.हिंगोली) येथील संभाजी विद्या मंदिर या शाळेच्या जागेवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणाबाबत**

**(२४) १२९६७ (०७-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील संभाजी विद्या मंदिर या शाळेच्या जागेवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा व्यवस्थापनाने वेळोवेळी विनंती करुनही नगर परिषद व पोलीस प्रशासनाने सदर अतिक्रमण काढण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेच्या जागेवरील अतिक्रमण काढण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येईल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२२-०१-२०१६) :** (१) होय.

(२), (३) व (४) सदरहू जागा ही खाजगी संस्थेची असून त्यातील नेमके किती क्षेत्रावर अतिक्रमण झाले किंवा कसे याची शहानिशा करणेसाठी संबंधीत जागेचे प्रथम सर्वेक्षण मोजणी करण्याच्या सूचना शाळा व्यवस्थापनास नगरपारिषदे मार्फत देण्यात आल्या आहेत.

मोजणी नंतर नेमके क्षेत्र तसेच त्यावरील अतिक्रमण या बाबी स्पष्ट झाल्यावर नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही हिंगोली नगरपरिषदे मार्फत प्रस्तावित आहे.

---

**नवी मुंबई सिडको प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भुसंपादित मिळकतीच्या वाढीव नुकसान भरपाईसाठी संदर्भीय अर्जासोबत जोडाव्या लागणाऱ्या कोर्ट फी व स्टॅम्प डयुटी रद्द करण्याबाबत**

**(२५) १३३८० (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई सिडको प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भुसंपादित मिळकतीच्या वाढीव नुकसान भरपाईसाठी संदर्भीय अर्जासोबत जोडाव्या लागणाऱ्या कोर्ट फी व स्टॅम्प डयुटी रद्द करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सिडको प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कोर्ट फी व स्टॅम्प डयुटी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१६) :**(१), (२), (३) होय, सिडको महामंडळाकडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित जमिनीच्या भूधारकांना देण्यात येणाऱ्या जमिनीच्या वाढीव नुकसान भरपाईसाठी कोर्ट फी स्टँप व स्टँम्प ड्युटी आकारण्यात येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंदपूर शहराच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२६) १३४९५ (०८-०४-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १८ डिसेंबर, २०१४ ला हिवाळी अधिवेशना दरम्यान ''चंद्रपूर जिल्हा आढावा बैठकी'' च्या वेळी स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना ''पंचशताब्दी वर्ष निमित्त चंद्रपूर शहराअंतर्गत पायाभूत सुविधांसाठी मंजूर असलेले रु. २५० कोटी निधी पैकी उर्वरित रु. २२५ कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत चे निवेदन सादर केले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने चंद्रपूर शहराच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास, होणा-या विलंबाचे सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१६) :**(१) होय
(२), (३) व (४) सदर निवेदनात नमूद केलेल्या कामांचा परिपूर्ण प्रस्ताव विहित कार्यपध्दतीचा अवलब करुन प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यतेसह शासनास सादर करण्याबाबत दि. २३ ऑक्टोंबर, २०१५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना कळविले आहे.

---

**ब्रम्हपूरी नगर परिषद (जि. चंद्रपूर) क्षेत्रातील देलनवाडी रोषनगर परिसरातील शेत सर्वे नं. १०९ आराजी १.५५ हेक्टर आर.जमीन बगीचा करिता आरक्षित केल्याबाबत**

**(२७) १४२४५ (०७-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ब्रम्हपूरी नगर परिषद (जि. चंद्रपूर) क्षेत्रातील देलनवाडी रोषनगर परिसरातील शेत सर्वे नं. १०९ आराजी १.५५ हेक्टर आर.जमीन बगीचा करिता आरक्षित करण्यात आले असतांना सुध्दा काही भुमाफियानी आर्थिक व्यवहार केल्यामुळे नगरपरिषद ब्रम्हपूरीने बगीच्या करिता आरक्षित असलेली जमीन खुली करुन परस्पर भुमाफियांनी विकून टाकल्याची धक्कादायक बाब दिनांक

१३ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ब्रम्हपुरीच्या नागरिकांनी या प्रकरणाची तक्रार केली असता सदर तक्रारच दाबून टाकण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१६) :**(१) ब्रम्हपूरी नगर परिषद क्षेत्राकरिता मंजूर असलेली विकास योजना दिनांक २६.०८.२००२ पासून अंमलात आलेली आहे. यामध्ये मौ. देलनवाडी, स.क्र.१०९, क्षेत्र १.८९ हे. आर (७/१२ प्रमाणे) ही जागा आरक्षण क्र. ६६ बगिचासाठी आरक्षित होती. सदर आरक्षणाखालील क्षेत्र खाजगी स्वरुपाचे असून उक्त आरक्षण विकसीत करण्याकरिता समुचित प्रधिकरण नगर परिषद, ब्रम्हपूरी आहे. संबंधित जागा मालकांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिनांक २२.०१.२०१३ रोजी बजावली. अशी सूचना प्राप्त झाल्यापासून १ वर्षाचे आत नगर परिषदेने सदर जागेच्या भूसंपादनाबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने अर्जदारांच्या जागेपुरते उक्त आरक्षण व्यपगत ठरले आहे. त्यामुळे शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक ०५.०९.२०१४ रोजी कलम १२७(२) अन्वये आरक्षण व्यपगत झाल्याचे आदेश अधिसूचित केले आहेत. त्यानुसार संबंधितांची जागा दिनांक ०५.०९.२०१४ पासून लगतच्या भूवापराप्रमाणे रहिवासी वापरण्यास उपलब्ध झाली आहे.
(२) ब्रम्हपूरी नगर परिषदेने दिनांक २०.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या अहवालानुसार याबाबतची तक्रार नगर परिषदेकडे दिनांक ०४.०२.२०१५ रोजी प्राप्त झाली. या प्रकरणात उक्त अधिनियमाचे तरतुदीनुसार शासन स्तरावरुन आरक्षण व्यपगत झाल्याचे आदेश निर्गमित झालेले असल्याने, याबाबतची तद्पश्र्चात केलेली तक्रार दाबुन ठेवली हे म्हणणे योग्य नाही.
(३) सदर प्रकरणात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वयेचे तरतुदीनुसार यथेचित कार्यवाही पुर्ण झालेली असल्याने शासनामार्फत चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी ग्रामीण भागात स्वतंत्र अग्निशमन दल नसल्याबाबत**

**(२८) १४९५१ (०७-०४-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी ग्रामीण भागात मागील दोन वर्षात लागलेल्या आगी आणि दुर्घटनांमध्ये २० कामगारांचे मृत्यू झाले आहेत आजपर्यंत २१४ लहान - मोठया आगीच्या घटना घडल्या असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडीच्या ग्रामीण भागात स्वतंत्र अग्निशमन दल नसल्यामुळे पालिकेच्ाी अग्निशमन वाहने पाठवावी लागतात, पुरेशी वाहने नसल्याने ठाणे, कल्याण येथून सुध्दा गाडया आणि जवान मागवावे लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिवंडीच्या ग्रामीण भागात स्वतंत्र अग्निशमन केंद्र स्थापन करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१६) :**(१) व (२) हे अशत: खरे आहे.
(३) व (४) भिवंडी परिसर अधिसूचीत क्षेत्राची विकास योजना शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ३१ अन्वये क्र. टिपीएस.१२१२/१६९९/सी.आर.क्र.१२७/२०१३ युडी-१२, दि. ११ मार्च , २०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार मंजूरी प्रदान केली असून काही क्षेत्र वगळलेला भाग (ई.पी) च्या स्वरुपात प्रसिध्द केलेला आहे. या विकास योजनेत प्राधिकरणाने प्रस्तावित केलेल्या एकूण १९ अग्निशमन केंद्राच्या वापरासाठीच्या आरक्षाणापैकी १३ आरक्षणे मंजूर केलेल्या विकास योजनेमध्ये दर्शविलेली असून उर्वरित ६ आरक्षणे कलम ३१ अन्वये प्रसिध्द केलेल्या वगळलेल्या भागाच्या विकास योजनेच्या अहवालानुसार संदर्भित आरक्षणांची अंमलबजावणी ही नियोजन प्राधिकरण/स्थानिक प्राधिकरण यांनी करावयाची आहे.

---

## वाशिम (जि.वाशिम) नगर परिषद अंतर्गत शहरात भूमिगत गटार योजना, वाढीव पाणी पुरवठा योजना, रमाई आवास योजना व रस्त्यांची कामे सुरू असून सदर कामे करताना सर्व नियम धाब्यावर बसवून शासनाच्या निधीची विल्हेवाट लावण्याचे काम सुरू असल्याबाबत

**(२९) १५६५७ (०७-०४-२०१५). श्री.लखन मलिक (वाशिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम (जि.वाशिम) नगर परिषद अंतर्गत शहरात भूमिगत गटार योजना, वाढीव पाणी पुरवठा योजना, रमाई आवास योजना व रस्त्यांची कामे सुरू असून सदर कामे करताना सर्व नियम धाब्यावर बसवून शासनाच्या निधीची विल्हेवाट लावण्याचे काम सुरू असतानाही अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही कामांमध्ये कंत्राटदार सर्रासपणे निकृष्ट कामे करीत असतानाही शासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार उक्त कामांमध्ये अपहार करणाऱ्या दोषींवर व कंत्राटदारांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०१६) :**(१), (२) , (३) व (४)
विभागीय आयुक्त, अमरावती यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटना डीएनई-१३६ या औरंगाबाद जिल्हा संघटनेच्या आर्थिक व्यवहाराचे शासकीय यंत्रणेकडून वार्षिक लेखा परिक्षण होत नसल्याबाबत**

**(३०) १६६०१ (१४-०८-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटना डीएनई-१३६ या औरंगाबाद जिल्हा संघटनेच्या आर्थिक व्यवहाराचे शासकीय यंत्रणेकडून वार्षिक लेखा परिक्षण होत नाही, त्यामुळे संघटनेचे पदाधिकारी सभासदांना गृहीत धरुन आर्थिक व्यवहार करीत असल्याचे माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उपरोक्त संघटनेच्या आर्थिक व्यवहाराची चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१८-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.
सदर संघटना श्रमिक संघ अधिनियम, १९२६ अंतर्गत नोंदणीकृत असून त्यामध्ये कलम २८(१) आणि विनियम १७(१) नुसार नमुना-आय मध्ये वार्षिक विवरणपत्र संबंधित उप निबंधक यांना ३० एप्रिल पूर्वी पाठविणो आवश्यक आहे. त्यामध्ये लेखा परिक्षकाचा जाहीरनामा देखील असतो. सदर संघटनेचे वार्षिक अहवाल सन २००५ पासून २०१२ पर्यंत प्राप्त झाल्याचे अभिलेखावरुन दिसून येते.
सदर संघटना मनमानी पध्दतीने आर्थिक व्यवहार करीत असल्याबाबतची बाब उप निबंधक यांना माहे मे, २०१५ रोजी व त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेने आता एन्क्रोचमेंट अँड रिमुवल ट्रॅकिंग सिस्टिम हे सॉफ्टवेअर विकसित करण्याबाबत**

**(३१) १६८८२ (११-०८-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने आता एन्क्रोचमेंट अँड रिमुवल ट्रॅकिंग सिस्टिम हे सॉफ्टवेअर विकसित केले असून याद्वारे मुंबईतील मोठ्या प्रमाणात होणा-या अनधिकृत बांधकामांबाबत

तक्रारी दाखल होऊन त्यांचेवर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रणालीद्वारे आजपावेतो किती अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे, सदर विकसित केलेल्या सॉफ्टवेअर प्रणालीचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही. तथापि, अनधिकृत बांधकामाची माहिती एकाच वेळेस बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांना व वरिष्ठ अधिकाऱ्यांना केव्हाही त्यांच्या संगणकावर उपलब्ध होईल या उद्देशाने विभाग कार्यालयामार्फत इमारती व कारखाने विभागाचे संगणकीकरण करण्याचे ठरविण्यात आले असून त्याचप्रमाणे उन्क्रोममेंट ॲड रिमुवल ट्रॅकिंग सिस्टीम हे सॉफ्टवेअर विकसित करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्यावतीने महाराष्ट्र स्मृती दालन शिवाजी पार्क येथे उभारण्याबाबत**

**(३२) १६९४४ (११-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्यावतीने शिवाजी पार्क येथे उभारण्यात आलेले संयुक्त महाराष्ट्र स्मृतिदालन दिनांक १ मे २०१५ या महाराष्ट्र दिनी बंद ठेवण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १०६ हुतात्मांना आपल्या प्राणाचे बलिदान घ्यावे लागले संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील या हुतात्म्यांचे बलिदान विस्मरणात जाऊ नये आणि खरा इतिहास लोकांना ज्ञात व्हावा यासाठी महाराष्ट्र स्मृती दालन बांधण्यात आले होते महाराष्ट्र दिनीची हे दालन बंद असल्याने सर्वसामान्यांकडून नाराजी व्यक्त केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र दिनीच संयुक्त महाराष्ट्र स्मृती दालन बंद ठेवण्याबाबत चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) दिनांक ०१ मे, २०१५ रोजी संयुक्त महाराष्ट्र स्मृती दालन सामान्य नागरिकांसाठी खुले ठेवण्यात आलेले होते. त्यामुळे नागरिकांकडून कोणत्याही प्रकारची लेखी अथवा मौखिक तक्रार दाखल करण्यात आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत सिग्नल यंत्रणा बंद असल्याबाबत

**(३३) १७३२८ (११-०८-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत रुपये ५५ लाख खर्चून सिग्नल यंत्रणा उभी करण्यात आली असून बहुतांशी सिग्नल बंद असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली परिसरातील बंद सिग्नलमुळे वाहतुक कोंडी व अपघातचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली परिसरातील वाहतूक समस्या व सिंग्नल समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१६) :**(१) होय.

कल्याण डोंबिवली संटीस प्रकल्पाची उभारणी आणि दुर्गामाता चौक , वल्लीेपोर चौक आणि सहजानंद चौक येथील रस्त्यांचे विस्तारिकरण, तसेच कॉक्रीटीकरणाची कामे सुरु असल्याने महानगरपालिकेकडून काही सिग्नल यंत्रणा काढून टाकण्यात आली आहे. तर उर्वरित सिग्नल यंत्रणेमध्ये पुनर्रचना करण्याचे प्रस्तावित आहे.

(२) काही प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे,हि बाब खरी आहे.

(३) सन २००१ च्या वाहतूक आराखडयानुसार कल्याण-डोबिवली महानगरपालिका क्षेत्रात सन २००५ मध्ये सिग्नल यंत्रणा बसविण्यात आली होती. तथापि, सन २००५ ते सन २०१५ या कालावधीत वाढलेली वाहनांची रहदारी, मुख्य रस्ते/चौकांचे विस्तारिकरण व वाढती वाहतूक घनता यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी महापालिकेने वाहतूक आराखडा तयार करण्याकरीता महानगरपालिकेकडून समंत्रक नियुक्तीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे महानगरपालिका क्षेत्रात टाटा रुग्णालयाच्या सहकार्याने अत्याधुनिक रुग्णालय उभारण्याबाबत

**(३४) १७८९० (१२-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुभाष भोईर (कल्याण**

**ग्रामीण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात कॅन्सर रुग्णांना दिलासा देण्यासाठी टाटा रुग्णालयाच्या सहकार्याने अत्याधुनिक रुग्णालय उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी झालेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कॅन्सर रुग्णांना त्याचा लाभ मिळावा याकरीता सदरचे रुग्णालय उभारण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) ठाणे महानगरपालिकेच्या महासभेने मौजे माजिवडे येथील सर्व्हे नं. ३००, ३०९, ३५८, ३६४ हा भूखंड किंवा अन्य तत्सम भूखंड कॅन्सर हॉस्पिटल उभारणेकरिता भाडेतत्वावर देणेबाबत दिनांक १४.५.२०१५ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

---

**अच्छाड (जि. ठाणे, ता. तलासरी) येथे खाजगी आराम बस व मिनी बस यांच्यात भीषण अपघातात कुटुंबातील ११ लोकांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३५) १९०३९ (११-०८-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अच्छाड (जि. ठाणे, ता. तलासरी) येथे दिनांक २५ मे, २०१५ रोजी खाजगी आराम बस व मिनी बस यांच्यात भीषण अपघात होऊन त्यात एकाच कुटुंबातील ११ लोकांचा मृत्यू झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) चौकशीअंती दोषी व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच अपघातात मृत्यू पावलेल्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१६) :** (१) दि. २५.५.२०१५ रोजी अच्छाड, ता.तलासरी, जि.पालघर येथे खाजगी आराम बस व मिनी बस यांच्या अपघात होऊन दोन कुटूंबातील १० जण व एका कुटूंबातील १ जण असे एकूण ११ जण मयत झाले आहेत.

(२) सदर प्रकरणी तलासरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ८०/२०१५ भा.दं.वि.सं. कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का. कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करुन तपास करण्यात आला आहे.
(३) सदर अपघात मिनी बसच्या चालकामुळे झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असून आरोपी चालकास दि. ३७.७.२०१५ रोजी टटक केली आहे. आरोपीविरुध्द दि. ८.९.२०१५ रोजी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, डहाणू यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

मृताच्या वारसांना व जखमींना मोटार अपघात दावा न्यायाधिकरणामध्ये नुकसपन भरपाई दावा दावादाखल करण्याकरीता आवश्यक ती कागदपत्रे पुरविण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपालिका हद्दीतील जवाहरलाल नागरी पुनरुत्थान योजनेअंतर्गत भुयारी गटार योजनेबाबत**

**(३६) १९३१० (११-०८-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपालिका हद्दीतील जवाहरलाल नागरी पुनरुत्थान योजनेअंतर्गत भुयारी गटार योजनेचे काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे झालेले असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती निकृष्ठ दर्जाचे काम करणा-या ठेकेदार कंपनीवर व निकृष्ठ दर्जाच्या कामाची देयके देणा-या नगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, दिरंगाईची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०१६) :**(१) नाही.
(२) जवाहरलाल नागरी पुनरुत्थात योजनेअंतर्गत मंजूर अंबरनाथ शहर भुयारी गटार योजनेतील कामांचे शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, बांद्रा यांनी वेळोवेळी तांत्रिक लेखापरिक्षण केले असून त्यांनी कामाचा दर्जा समाधानकारक असल्याचा अहवाल दिलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जवाहर विद्यालय महानगरपालिका पाण्याची टाकी ते अशोकनगर, कस्तूरबानगर, सह्याद्री नगर डी.पी.रोड बनविण्याबाबत**

**(३७) १९६३२ (१९-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवाहर विद्यालय मनपा पाण्याची टाकी ते अशोकनगर, कस्तूरबानगर, सह्याद्री नगर डी.पी.रोड बनविण्याबाबत या विषयावरील दिनांक २३/०३/२०१५ रोजीचे निवेदन अणुशक्तीनगर, मुंबई येथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सदर रस्त्याला १८.३० मी.सी. रस्ता रेषा विहित करण्याची प्रक्रीया चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चेंबूर, मुंबई येथील शाळेकरिता आरक्षित असलेले भूखंड कै.अमरनाथ वामन पाटील शिक्षण संस्थेस वितरित करण्याबाबत**

**(३८) १९६३६ (११-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएमआरडीए वसाहत, वाशीनाका, चेंबूर, मुंबई येथील शाळेकरिता आरक्षित असलेले भूखंड (प्लॉट क्र.२६० व ३६१) कै.अमरनाथ वामन पाटील शिक्षण संस्थेस वितरित करण्याबाबत या विषयावरील दिनांक ५ मे, २०१५ रोजीचे निवेदन अणुशक्तीनगर मुंबई येथील लोकप्रतीनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) पुनर्वसन वसहतीमधील

बृहन्मुंबईच्या विकास आराखड्यात सार्वजनिक वापरासाठी आरक्षित असा भूखंड विकासकाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे व ती पालिकेने विहीत वापरासाठी विकसीत करणे अपेक्षित आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून माहिती प्राप्त करुन सन्मा, लोकप्रतिनिधींना अवगत करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रस्तावित आहे.

---

**चेंबूर व पांजरापोळ जोडरस्ता (पूर्व मुक्त मार्ग) रस्त्याचे काम करतांना प्रकल्पबाधित पुनर्वसन केलेल्या व पुर्नवसन न झालेल्या झोपडीधारकांबाबत**

**(३९) १९६४७ (१०-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर व पांजरापोळ जोडरस्ता (पूर्व मुक्त मार्ग) रस्त्याचे काम करतांना प्रकल्पबाधित पुनर्वसन केलेल्या व पुनर्वसन न झालेल्या झोपडीधारकांबाबत दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आणि याप्रकरणी कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१६) :**(१) होय.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी बैठक घेण्यात आली.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईच्या निर्मिती होऊन अद्यापही ५० टक्के शेतक-यांना साडेबारा टक्के भूखंड परतावा न मिळाल्याबाबत**

**(४०) १९८४४ (१२-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित केल्या त्यापैकी अद्यापही ५० टक्के शेतक-यांना साडेबारा टक्के भूखंड परतावा मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित ५० टक्के प्रकल्पग्रस्त शेतक-यांना परतावा तातडीने देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वाकरण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०१६) :**(१) व (२) ठाणे, पनवेल आणि उरण तालुक्यातील मिळून १२.५ टक्के योजनेतर्गत साधारणपणे ८७८.२० हे क्षेत्र देय असून यापैकी ८०.०५ टक्के क्षेत्र सुधारकांना प्रत्यक्ष तब्यात देण्यात आले आहे. उर्वरित इरादित करण्यात आलेल्या भुखंडाबाबत कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला होता. त्यानुसार २७६९ भुखंडापैकी ३५१ भुखंड वाटप करण्यात आले व उर्वरित प्रकरणांबाबत वारस दाखला व अन्य कारणासाठी भूखंड वाटप

प्रलंबित आहेत, तसेच इरादित व करण्यात आलेल्या भुधारकांसाठी कार्यवाही सुरु आहे.
(३) १२.५ टक्के योजनेमध्ये भूधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न करणे व इतर न्यायालयीन बाबीमुळे भूखंड वाटपाच्या प्रक्रियेला विलंब होत आहे.

---

**कल्याण तालुक्यातील कल्याण-शिळफाटा रस्त्याच्या गोळवली गाव ते मानपाडा रस्त्याच्या दुतर्फावर अनधिकृत टपऱ्या उभारण्यात आल्याबाबत**

**(४१) १९९२२ (१७-०८-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण तालुक्यातील कल्याण-शिळफाटा रस्त्याच्या गोळवली गाव ते मानपाडा रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर अनधिकृत टपऱ्या उभारण्याचे काम चालू असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनधिकृत टपऱ्यांमूळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने या टपऱ्यांवर कारवाई करण्यात येते काय,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात दि. ०१.०६.२०१५ पासून १२७ गावांचा समावेश करण्यात आला असून या २७ गावांमध्ये गोळवली गावाचा समावेश आहे.

सदरचा शिळफाटा रस्ता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या कार्यक्षेत्रात येतो. या रस्त्यावर गोळवली गाव ते मानपाडापर्यंत दुतर्फा असलेल्या अनधिकृत टपऱ्यांबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस तक्रार अर्ज प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण पथकाकडून या रस्त्यालगतच्या टपऱ्या हटविण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.
(३) नाही.

या टपऱ्यांवर कल्याण-डोंबिवली महानगीपालिकेकडून कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शहरातील ११ चौकामध्ये सिग्नल यंत्रणा बंद असल्याबाबत**

**(४२) २१८०५ (११-०८-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने गेल्या काही वर्षात ५४ लाख रुपये खर्च करुन शहरातील ११ चौकामध्ये सिग्नल यंत्रणा उभारली असून ती वर्षभरातच बंद पडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेली पालिका क्षेत्रातील ११ चौकांमधील सिग्नल यंत्रणा दि. २६/०७/२००५ रोजी झालेल्या अतिपर्जन्यमुळे बंद पडली होती. मात्र महानगरपालिकेमार्फत ही सिग्नल यंत्रणा ऑक्टांबर, २०१५ मध्ये आवश्यक दुरुस्ती करुन पुर्ववत करण्यात आली.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शहरात मागील वर्षी २८० तर गेल्या तीन महिन्यात ६३ जणांचा वाहन अपघातात बळी गेल्याबाबत**

**(४३) २२०६९ (११-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात मागील वर्षी २८० तर गेल्या तीन महिन्यात ६३ जणांचा वाहन अपघातात बळी गेलेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात होणा-या एकुण अपघातांपैकी ७० ते ८० टक्के अपघात हे मानवी चुकांमुळे तसेच रस्त्यांची झालेली दुरावस्था, वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ व शिस्तीचा अभाव यामुळे सुध्दा अपघातांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाहन अपघातांवर आळा घालण्याकरीता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नागपूर शहरामध्ये होणाऱ्या अपघातांवर आळा घालण्यासाठी बेशिस्त वाहनचालकांवर सातत्याने कारवाई केली जाते. सन २०१४ मध्ये २,८१,५८० बेशिस्त वाहन चालाकांवर कारवाई करण्यात आली असून सन २०१५ ३,५६,८४५ बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच, मद्यसेवन करुन वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर २०१४ व २०१५ मध्ये अनुक्रमे १३,२८८ व १७,९८१ केसेसे करण्यात आल्या आहेत.

वाहतूक नियमान व नियंत्रणाकरीता महत्वाचे चौकात तसेच पेट्रोलिंगकरीता वाहतूक पोलीसांची नेमणूक करण्यात येते.

वारंवार वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालाकांचे वाहन चालक परवाने रद्द करण्याकरिता प्रादेशिक परिवहन विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येतात.

नागपूर शहरामधील अपघातप्रवण स्थळे निश्चित करुन त्यांची दुरुस्ती करण्याबाबत महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरवा करण्यात येत आहे. वाहतूक नियमांबाबत शहरातील शाळा/महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण होण्याच्या दृष्टीने शिबीरे आयोजित केली जातात. स्वयंसेवी संस्था रस्ता सुरक्षा दल, रेडीओद्वारे वाहतूक नियम पालनाबाबत जनजागृती केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील पौड रस्ता- बावधन खुर्द गावाला स्वतःची स्मशानभूमी असतानाही रहिवाशांना शेजारच्या बावधन बुद्रुक गावातील स्मशानभूमीमध्ये अंत्यविधीसाठी जावे लगत असल्याबाबत**

**(४४) २२३१२ (०६-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पौड रस्ता- बावधन खुर्द गावातील करास पात्र इमारती व जमीन यांची १९९५-९६ च्या सालाबद्दलची आकारणी यादी या नमूद उता-यावर स्मशानभूमीच्या जागेचा उल्लेख असलेली मिळकत क्रमांक ३८७ ही जागा चोरीला गेल्याची तक्रार येथील स्थानिक रहिवाशांनी केली असल्याचे दिनांक १६ मे, २०१५ रोजी उघड झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावाला स्वतःची स्मशानभूमी असतानाही रहिवाशांना शेजारच्या बावधन बुद्रुक गावातील स्मशानभूमीमध्ये अंत्यविधीसाठी जावे लगत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीत अंती दोषीं आढळून आलेल्यानवर कोणती कारवाई सर्व करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१६) :**(१) होय. दिनांक २१.५.२०१५ रोजी बावधन खुर्द येथील पुणे महानगरपालिकेची स्मशानभूमी चोरीला या आशयाची बातमी दे. सकाळ व दूरचित्रवाणी या प्रसार माध्यमांमध्ये झळकली असल्यामुळे महानगरपालिकेची नाचक्की झाली असल्याचे सहसयोजक महाराष्ट्र प्रदेश उद्योग आघाडी यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

(२) होय.

बावधन खुर्द येथील महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना सद्यस्थितीत बावधन बुद्रुक येथील स्मशानभूमी येथे अंत्यविधीकरिता जावे लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(३) सदर स्मशान भूमीची जागा मोजणी करुन ताब्यात घेणेकामी कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार भूमी अभिलेख कार्यालयाकडे मोजणी फी भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
मोजणीअंती जागा निश्चित झाल्यानंतर या जागेचा वापर स्मशानभूमीसाठी करण्याचे पुणे महानगरपालिकेतर्फे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तुळजापूर (जि.उस्मानाबाद) शहरात विविध विकास कामे सुरु असल्याबाबत**

**(४५) २२४१९ (११-०८-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून तुळजापूर शहरात विविध विकास कामे सुरु आहेत, हे खरे आहे कय,

(२) असल्यास, या कामाची माहे मे, २०१५ पर्यंतची प्रगती व सद्यिस्थती काय आहे व यावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१६) :**(१) होय.

(२) तुळजापूरद विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून आता पर्यंत भक्त निवास बांधकाम, रस्ते, वाहनतळ, सुशोभिकरण इत्यादी विकास कामे संबंधित कार्यन्वयीत येत्रणेमार्फत करण्यात आली आहेत. या कामावर माहे सप्टेंबर, २०१५ अखेर पर्यंत क्र. २०९९९.७६ लक्ष इतका निधी खर्च झालेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे परिक्षेत्रात आरोग्याची सुरक्षितता आणि दक्षता म्हणून हॉस्पिटमधील शेकडो टन जैव वैद्यक कचरा उघडयावर टाकण्यात येत असल्याबाबत**

**(४६) २३५६९ (१२-०८-२०१५). श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे परिक्षेत्रात आरोग्याची सुरक्षितता आणि दक्षता म्हणून हॉस्पिटलमधील शेकडो टन जैव वैद्यक कचरा उघडयावर न टाकण्याचे निर्देश असताना शहरात सर्रास उघड्यावर कचरा टाकला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जैव वैद्यक कचरा नोंदणीसाठी महानगरपालिका प्रशासनाने सक्ती करुनही तब्बल ८० ते ८५ टक्के वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नोंदणी केली नसल्याने कचरा वेचक, खेळणारी लहान मुले व नागरिकांच्या संपर्कात हा जैव वैद्यक कचरा आल्यास त्याचे आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेकडे २९०० वैद्यकीय आस्थापनांनी नोंदणी केलेली आहे. ज्या वैद्यकीय आस्थापनांनी नोंदणी केलेली नाही अशा वैद्यकीय आस्थापनांना नोंदणी करणेबाबत प्रोत्साहन देणेकरिता कार्यवाही चालू आहे.

याबाबत विविध वैद्यकीय संघटना यांचे पदाधिकाऱ्यांसमवेत बैठका घेण्यात येत आहे. तसेच वारंवार दैनिक वृत्त पत्रातून आवाहन करण्यात येत आहे. तसेच दिनांक १९.५.२०१४ रोजी संघटनांची बैठक घेवून कचऱ्यांचे विल्हेवाटीचे शुल्क रक्कम रुपये २९०४/- वरुन २१००/- इतके करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाधुर धरणातून शहराला करण्यात येणा-या पाणीपुरवठ्याची वितरण व्यवस्था बदलण्याबाबत**

**(४७) २५२७० (१४-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहराला पाणीपुरवठा करणा-या वाधुर धरणामध्ये पाण्याचा मुबलक साठा असला तरी सध्या दोन दिवसांआड पाणीपुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जुनावट वितरण व्यवस्थेमुळे ही स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त धरणातून शहराला करण्यात येणा-या पाणीपुरवठ्याची वितरण व्यवस्था बदलण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
वाधुर धरणाहुन, जळगाव शहरासाठी पाणी पुरवठा योजना कर्यान्वित होण्यापुर्वी शहरातील पाणी पुरवठ्याची अन्य साधने विचारात घेऊन , पाणी पुरवठा साधनांच्या पंपीग क्षमतेनुसार शहरामध्ये वितरण वाहिन्या टाकण्यात आलेल्या होत्या.

सन २००८ साली वाघुर धरणावरुन पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झाली असली तरी सदर योजनेअंतर्गत परिमंडळ निहाय नविन वितरण वाहिन्या टाकण्याचे सदर काम निधीअभावी पुणे होऊ शकले नाही. परिणामी पुर्वीच्याच वितरण वाहिन्यांमधून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

शहरातील नळ जोडणी संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून, वितरण वाहिन्यांच्या लांबीत देखील वाढ झाली असल्याने २ दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) केंद्र शासनाच्या "अमृत" योजनेंतर्गत वितरण वाहिन्या बदलविण्याच्या कामासह पाण्याच्या उंच टाक्या, भूमीगत टाक्या, पंपींग मशीनरी, पंप हाऊस, नळ जोडणी, जलमापक सयंत्रे, मुख्य जलवाहिनी, ही कामे प्रस्तावित करुन, एकूण रुपये ४६० कोटींचा कामांचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे.

यापैकी, सद्या अस्तित्वात असलेल्या वितरण वाहिन्या बदलविण्यासाठी रक्कम रुपये १२६० कोटीचा खर्च अंतर्भुत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री.आई तुळजाभवानी आसरामाता संस्थान अनिकट अकोला यास 'ब' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देऊन विकास आराखड्यात मान्यता देणेबाबत**

**(४८) २५७०४ (११-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत श्री. आई तुळजाभवानी आसरामाता संस्थान अनिकट अकोला या संस्थानला "ब" वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबतची मागणी माहे फेब्रुवारी, २०१० पासून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तत्कालीन लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ जुलै, २०१३ रोजी वा च्या दरम्यान लेखी निवेदन देवून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची विनंती केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.आई तुळजाभवानी आसरामाता संस्थान अनिकट अकोला चा सुमारे रुपये ७६ लाखाचा प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी यांनी नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, याबाबत शासनाची स्पष्ट भूमिका काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१६) :**(१), (२) व (३) होय.

(४) व (५) सदर प्रस्ताव तपासणी सूची प्रमाणे अद्यावत करुन विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांचे मार्फत शासनास सादर करण्याबाबत दि. ६ एप्रिल, २०१५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, अकोला यांना कळविले आहे.

---

## औरंगाबाद शहरात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत

**(४९) ३३२०१ (२१-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात एकूण ५२ झोपडपट्ट्या असून दोन लाखांपेक्षा जास्त लोक राहत असून दिनांक १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी पत्रकार परिषद घेऊन पालकमंत्री यांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचा निर्णय जाहिर केला, परंतु आजपावेतो कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१६-०२-२०१६) :**(१) व (२) पालकमंत्री औरंगाबाद यांनी औरंगाबाद शहरासाठी झोपडपट्टी पुनवर्सन योजना राबविण्याची दि. १३.२.२०१५ च्या पत्रकार परिषदेमध्ये घोषणा केली आहे. औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना करण्याविषयी औरंगाबाद महानगरपालिकेने दि. २१.२.२०१५ रोजी ठराव पारित केला आहे. त्या अनुषंगानेपरिपूण प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना औरंगाबाद महानगरपालिकेस दि. २९.१०.२०१५ रोजी देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीमुंबई येथे झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्याबाबत

**(५०) ३८७३० (२३-१२-२०१५). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईमध्ये झोपडपट्टीचे प्रमाण अधिक असल्याने तेथे नागरी सुविधा तसेच अत्यावश्यक सेवा उपलब्ध करुन देत असताना शासनाला अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टीमध्ये राहणा-या नागरीकांचे राहणीमान सुधारुन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणून सुविधांचा लाभ देण्याकरीता झोपडपट्ट्यांमध्ये झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महापौर, नवी मुंबई यांना दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(५) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. प्रकाश महेता (१६-०२-२०१६)** :(१) प्रश्नात नमूद निवेदन महापौर, नवी मुंबई महानगरपालिका यांना दिनांक २३.०९.२०१५ रोजी दिलेले आहे.
(३), (४) व (५) प्रश्नात नमूद दि. २३.०९.२०१५ व निवेदन शासन स्तरांवर प्राप्त झालेले नाही. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त माहितीनुसार त्यांच्याकडे दिलेल्या निवेदनावर कोणतीही कार्यवाही त्यांच्याकडून करण्यात आलेली नाही. तथापि, मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना (SRA) लागू करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.